Research Papers

"पुणे शहरातील नागरी सहकारी बँक विस्ताराचा अभ्यास"

प्रा . डॉ . विकास ज . पवार
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
सी . के . गोयल महाविद्यालय
दापोडी, पुणे 12

प्रस्तावना

प्रत्येक देशाचा, अर्थव्यवस्थेचा किंवहुना शहराचा आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकास हा प्रामुख्याने बँक सेवा विस्तारावर अवलंबून असतो . बँक सेवा जेवढया प्रगत व आधुनिक असतात तेवढी लोकांना आर्थिक व्यवहारात बँक सेवांचा उपयोग करण्याची संधी जास्त उपलब्ध होते . बँका ठेवींच्या स्वरूपात भांडवल संचय करून कर्ज रूपाने भांडवल गुंतवणुकीला चालना देतात . त्यामुळे भांडवल पुरवठा मोठया प्रमाणात होऊन देशाचा आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकास होण्यास मदत होते . पुणे शहराचा आर्थिक, सामाजिक, राजकीय, भौगोलिक विकास फार झपाटयाने होत आहे . या विकासात नागरी सहकारी बँकांचे योगदान मोठे आहे .

कोणत्याही अर्थव्यवस्थेत बँकांना अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले असते . ज्याप्रमाणे मानवी शरीरात रक्तवाहिन्यांना महत्त्वाचे स्थान असते तसे अर्थ व्यवस्थेत बँका ह्या विकासाचा महत्त्वाचा घटक आहेत . अर्थव्यवस्थेचा विकास मोठया प्रमाणावर बँकांच्या प्रगतीवर अवलंबून असतो . भांडवलाशिवाय कुठलाही व्यवसाय, उद्योग व व्यापार करणे, अशक्य आहे . अशा बँकांचा विस्तार कितपत झाला आहे हे महत्त्वाचे ठरते . पुणे शहराच्या विकासात नागरी सहकारी बँकांचे योगदान महत्त्वाचे आहे . यादृष्टीने या अभ्यासास महत्त्व प्राप्त होते .

1862 मध्ये जगातील पहिली नागरी सहकारी बँक जर्मनीमध्ये स्थापन झाली . भारतात **19** व्या शतकाच्या पुर्वार्धात प्रेसिडेन्सी बँका स्थापन झाल्या . **1** एप्रिल **1935** ला मध्यवर्ती बँकेची स्थापना होऊन तीचे **1949** मध्ये राष्ट्रीयीकरण झाले . पुढे **1** जुलै **1955** रोजी स्टेट बँक ऑफ इंडिया स्थापन झाली . **19** जुलै **1969** रोजी भारताच्या राष्ट्रपतींनी वटहुकूमाद्वारे **14** मोठया व्यापारी बँकांचे, राष्ट्रीयीकरण केले . **15** एप्रिल **1980** रोजी आणखी **6** व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले . त्यानंतरच्या काळात मात्र भारतात व्यापारी व सहकारी बँकांचे प्रचंड मोठया प्रमाणात जाळे निर्माण झाले .

अभ्यासाची उद्दिष्टे ः

1 . पुणे शहराच्या विकासात नागरी सहकारी बँकांच्या भूमिकेचा अभ्यास करणे .

2 . पुणे शहराच्या शैक्षणिक व सामाजिक विकासात नागरी सहकारी बँकांचा सहभाग तपासणे .

गृहितके ः

1 . नागरी सहकारी बँक सेवा विस्तारामुळे रोजगार वृद्धी झाली आहे .

2 . नागरी सहकारी बँकांमुळे पुणे शहराचा आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकास झाला आहे .

संशोधन पद्धती ः पुणे जिल्ह्यात नागरी सहकारी बँका **63** असून त्यातील पुणे शहरातील सर्वेक्षणासाठी नमुना निवड पद्धतीने **08** बँकांची निवड केली याचे शेकडा प्रमाणे **12 . 69** टक्के आहे . निवडलेल्या प्रत्येक बँकेच्या एका शाखेतून कर्जप्रकारानुसार कोटा नमुना पद्धतीने **5** कर्ज लाभधाराकांची निवड करून एकूण **40** लाभ धारकांची प्राथमिक माहिती संकलित केली आहे .

पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक विस्तार

पुणे जिल्ह्यात नागरी सहकारी बँकांचे मोठे योगदान आहे . जिल्ह्यात मोठया प्रमाणात या बँकांकडून वित्तपुरवठा केला जातो . या बँकांची वृद्धी व विस्तार पुढील तक्तयात दर्शविला आहे .

Please cite this Article as : प्रा . डॉ . विकास ज . पवार ,"पुणे शहरातील नागरी सहकारी बँक विस्ताराचा अभ्यास" **: Indian Streams Research Journal (April ; 2012)**

तक्ता क्र . 1

पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक वृद्धी

अ . क्र .	वर्ष	बँकांची संख्या	शाखा	एकूण ठेवी (को . रू .)	एकूण कर्ज (को . रू)
1	1992–93	42	180	853	649
2	1995–96	40	234	1,762	1,270
3	2000–01	62	368	7,203	4,913
4	2005–06	63	483	11,847	7,180
5	वार्षिक सरासरी दर	–	18 . 76	88 . 04	79 . 24

आधार पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक असोसिएशन लि . पुणे वार्षिक अहवाल

वरील तक्त्यात पुणे जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांची संख्या दर्शविली आहे . ती 1992 ला 42 होती तर 2005 ला ही संख्या 63 इतकी झाली आहे . या कालावधीत या बँकांच्य जिल्ह्यात 198 शाखांवरून 483 इतकी वाढ झाली आहे . ही वाढ वार्षिक सरासरी 18 . 76 टक्के झाली आहे . 1992 ला जिल्हा नागरी सहकारी बँकांच्या ठेवी 853 कोटी रूपये एवढया होत्या त्या 2005 ला 11,847 कोटी रूपये एवढया वाढल्या आहेत . ठेवीतील वार्षिक वाढ 88 . 04 टक्के इतकी आहे . तर याच काळात कर्ज वाटप 649 कोटी रूपये वरून 7180 कोटी रूपये पर्यंत वाढले आहे . ही कर्जातील वाढ 79 . 24 टक्के इतकी आहे . या आकडेवारीवरून पुणे जिल्ह्यात नागरी सहकारी बँकांचे योगदान मोठया प्रमाणावर आहे असे दिसून येते .

पुणे शहरात कार्यरत असणाया नागरी सहकारी बँकांपैकी आठ बँकांची सर्वेक्षणासाठी निवड केली असून त्यांचे कर्ज व ठेवींचे प्रमाण पुढील तक्तयात दर्शविले आहे .

तक्ता क्र . 2

प्राथमिक माहिती संकलनासाठी निवड केलेल्या बँकांची ठेव व कर्ज स्थिती

अ . क्र .	बँका	ठेवी (को . रू .)		कर्ज (को . रू .)	
		2001	2005	2001	2005
1	कॉसमॉस बँक	1713 . 00	3680 . 0	1017 . 0	1581 . 0
2	राजगुरू सहकारी बँक	76 . 14	122 . 62	47 . 93	73 . 40
3	शरद सहकारी बँक	38 . 11	70 . 39	27 . 73	41 . 99
4	जनता सहकारी बँक	412 . 87	1510 . 31	387 . 12	1046 . 12
5	राजर्षि शाहू बँक	59 . 20	81 . 37	44 . 49	70 . 35
6	विद्या सहकारी बँक	196 . 95	221 . 41	101 . 48	116 . 74
7	श्री गणेश सहकारी बँक	8 . 13	12 . 61	7 . 02	10 . 35
8	भगिनी निवेदिता सहकारी बँक	278 . 8	259 . 14	163 . 39	147 . 81
	एकूण	2783 . 2	5957 . 85	1796 . 85	3087 . 76
	वार्षिक वाढ	–	9 . 34	–	11 . 63

आधार वार्षिक अहवाल

वरील तक्त्यात प्राथमिक माहिती संकलित करण्यासाठी निवडलेल्या आठ बँकांच्या 2001 मध्ये एकूण ठेवी 2783 . 2 कोटी रूपये होत्या . त्या 2005 मध्ये 5957 . 85 कोटी रूपये इतक्या वाढल्या आहेत . ठेवींतील वार्षिक सरासरी वाढ 9 . 34 टक्के झाली आहे . तर या बँकांचे कर्ज वाटप 2001 मध्ये 1796 . 15 कोटी रूपये होते . तेच कर्जाचे प्रमाण 2005 मध्ये 3087 . 76 कोटी रूपये इतके वाढले आहे . कर्जातील वार्षिक सरासरी वाढ 11 . 63 टक्के इतकी होती .

Please cite this Article as : प्रा . डॉ . विकास ज . पवार , "पुणे शहरातील नागरी सहकारी बँक विस्ताराचा अभ्यास" : **Indian Streams Research Journal (April ; 2012)**

तक्ता क्र . 3

कर्जधारकांचे जातीनुसार वर्गीकरण

अ . क्र .	जात	कर्जधारक संख्या	शेकडा प्रमाण
1 .	अनुसूचित जाती	04	10 %
2 .	अनुसूचित जमाती	08	20 %
3 .	इतर मागास वर्ग	15	37 . 5 %
4 .	मराठा (खुला वर्ग)	12	30 . 0 %
5 .	माहिती न मिळणे	01	2 . 5 %
	एकूण	40	100 %

आधार क्षेत्रीय पाहणी

वरील तक्त्यात प्राथमिक माहिती संकलित करण्यासाठी निवडलेल्या 40 लाभधारकांचे जातीनुसार प्रमाण दर्शविले आहे . अनुसूचित जातीचे लाभधारक 10 टक्के आहेत . अनुसूचित जमातीचे लाभधारक 20 टक्के तर इतर मागासवर्गातील प्रमाण दर्शविले आहे . अनुसूचित जातीचे लाभधारक 10 टक्के आहेत . अनुसूचित जमातीचे लाभधारक 20 टक्के तर इतर मागास वर्गातील लाभधारकांचे प्रमाण 37 . 5 टक्के आणि मराठा खुल्या वर्गातील लाभधारकांचे प्रमाण 30 . 0 टक्के इतके दिसून आले .

1 . फ्रँकिंग सेवा, मनी चेंजींग सेवा, शेअर ब्रोकर, प्रवासी चेक, ए . टी . एफ . केंद्र या सेवा देणाया बँकांचे प्रमाण 56 . 41 टक्के इतके आहे .

2 . 16 ते 20 टक्के एन . पी . ए . चा दर असणाया बँकांचे प्रमाण 25 . 0 टक्के आहे .

3 . शैक्षणिक कर्ज वाटपाचे प्रमाण 19 . 4 टक्के आहे . बाकी सर्व कर्जपुरवठा उद्योग, व्यवसाय, घरबांधणी यासाठी केलेला आढळतो .

4 . अशिक्षित कर्जलाभधारकांचे प्रमाण फक्त 7 . 22 टक्के आढळते . शहरी भाग असल्यामुळे उच्चशिक्षित कर्जदारांचे प्रमाण 68 . 2 टक्के इतके दिसून आले आहे .

5 . कर्ज घेऊन अपेक्षित उद्दिष्ट पूर्ण झाले आहे . असे म्हणणाया कर्जलाभधारकांचे प्रमाण 42 . 8 टक्के इतके होते .

6 . कर्ज घेतल्यामुळे कायमस्वरूपी रोजगार उपलब्ध होण्याचे प्रमाण 52 . 77 टक्के इतके होते .

शिफारशी

1 . घरबांधणी कर्ज घेताना घराचे गहाणखत करावे लागते . त्यासाठी स्टँप डयूटीचा खर्च जास्त येतो . त्यामुळे कर्ज खर्च जास्त येतो असा खर्च कमी करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे .

2 . व्यापारी बँकांपेक्षा या नागरी सहकारी बँकांचा कर्जावरील व्याजदर जास्त आहे . तो कमी करण्याचा प्रयत्न करावा .

3 . बँकांनी कर्ज वाटप करताना केवळ विशिष्ट वर्गातील लोकांनाच किंवा संचालकांच्या नात्यातील लोकांनाच अधिक प्रमाणात कर्ज न देता सर्व समाजातील गरजू लोकांनाच अधिक प्रमाणात कर्ज देण्याचा प्रयत्न केला पाहिजे .

4 . कर्ज वाटप करताना बँका तारणाची गुणवत्ता व कर्ज परतफेडीची पात्रता या घटकांना अधिक महत्त्व देताना दिसतात . त्यामुळे गरजू व आर्थिक परीस्थिती सामान्य असणायांना कर्ज सुविधा फारशी मिळत नाही . या संदर्भात बँकांनी आपल्या भूमिकेत योग्य तो बदल करावा .

संदर्भ

1. Deshmukh Prasanna G. Working of Co-operative Banks in India, Kanishka Publisher, New Delhi, 2002.

2. Vasudevan A. "Indian Banking" "Academic Foundation, New Delhi, 2003

3 . जोशी, डांगे "बँकिंग फायनान्स" चतुर्थ आवृत्ती, फडके प्रकाशन, कोल्हापूर , 2004

4 . पुणे जिल्हा बँक्स असोसिएशन लि . पुणे वार्षिक अहवाल .

Please cite this Article as : प्रा . डॉ . विकास ज . पवार ,"पुणे शहरातील नागरी सहकारी बँक विस्ताराचा अभ्यास" **: Indian Streams Research Journal (April ; 2012)**